स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत लोकप्रशासन या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी)
पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा प्रारुप आराखडा

ई-गव्हर्नन्स चा महाराष्ट्राच्या महसूल प्रशासनावर झालेला प्रभाव
विशेष संदर्भ : नागपूर विभाग.

संशोधक

स्वाती वसंतराव सुर्यवंशी

मार्गदर्शक

डॉ.पंचशील एकंबेकर

प्राचार्य,

बी.पी.एकंबेकर कॉलेज,

हानेगाव, ता.देगलूर, जि.नांदेड.

संशोधन केंद्र

नेताजी सुभाषचंद्र बोस,

महाविद्यालय, नांदेड.

3 सप्टेंबर-2023

ई-गव्हर्नन्सचा महाराष्ट्राच्या महसूल प्रशासनावर झालेला प्रभाव
विशेष संदर्भ: नागपूर विभाग

प्रस्तावना :

भारतात अति प्राचीन काळापासून प्रशासनाचा घटक म्हणून जिल्हा अस्तित्वात आहे, जो प्रशासनाच्या सोईचा घटक आहे. जिल्हा हा प्रशासनासाठी असलेला विशिष्ट भू-भाग आहे. महसूल प्रशासनाची अनेक कार्य महत्वपूर्ण पार पाडणारा तो अत्यंत उपयुक्त आणि महत्वाचा घटक आहे. सामान्य जनतेचा दैनंदिन व्यवहारात महसूल प्रशासनाशी संबंध येतो. राज्य व केंद्र शासनाशी संबंध हा जिल्हा प्रशासनाद्वारे साधता येतो. जेथे लोक प्रशासनाची सर्व अभिकरणे, उपकरणे आणि सुव्यवस्थित कार्यरत असतात. त्याव्दारे लोककल्याणाच्या व शासनाच्या महत्वपूर्ण महसूली योजना लोकांपर्यंत पोहचविल्या जातात.

भारतामध्ये आज आपण जिल्हा प्रशासनाचे जे चित्र पाहतो त्याची ख-या अर्थाने सुरुवात ब्रिटिशाच्या काळात झाली. ईस्ट इंडिया कंपनी ने दिवाणी अधिकार आपल्याकडे घेतले तेव्हा पासुन महसूल प्रशासनावर इंग्रजाची छाप पडलेली दिसते. इंग्लंडमध्ये ‘डिस्ट्रिक्ट' हा घटक दिवाणी व फौजदारी न्याय व्यवस्थेसाठी अस्तित्वात होता.त्या विभागावर म्हणजे 'डिस्ट्रिक्ट' वर कायदा व सुव्यवस्था, महसूल व्यवस्था या कामांसाठी सन 1772 मध्ये वारन हेस्टिंग ने जो प्रशासकीय अधिकारी नियुक्त केला त्याला 'कलेक्टर' असे संबोधण्यात आले. ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्हा निर्माण केला आणि त्यावर जिल्हाधिकारी हा प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमला. तेव्हापासून प्रशासनाचा महत्वपूर्ण घटक म्हणून 'जिल्हा' आजपर्यंत व्यवहृत आहे आणि त्यावरील 'जिल्हाधिकारी’ हे पद देखील जश्याच तसे आपण स्वीकारलेले आहे.त्यावेळी जिल्हाधिका-यांकडे संपूर्ण प्रशासनाची सूत्रे सोपविण्यात आलेली होती ती आजही त्यांच्याकडे सुरक्षित आहेत.–

ईस्ट इंडिया कंपनी ने ‘दिवाण’ ही भूमिका स्वीकारून आपल्यासेवकांच्या मदतीने महसूलाची संपूर्ण व्यवस्था पाहण्याची व त्याच्यासंबंधीच्या प्रशासनाची जवाबदारी स्वत:वर घेण्याचा ऐतिहासिक निर्णय कंपनीच्या इंग्लंडमधील संचालक मंडळाने घेतला होता. त्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, महसूलाचे संकलन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखरेख करण्यासाठी आणि न्यायालयाच्या कामकाजाच्या नियमनासाठी अधिका-यांची नेमणूक करण्यात आली. तेव्हापासून तेव्हापासून जिल्हाधिका-यांच्या अधिकारात वाढ होत गेलेली आहे. 'महसूलाचे संकलन करणारा अधिकारी’ एवढे त्यांच्या कार्याचे क्षेत्र मर्यादीत राहीलेले नाही तर त्या पदाला ब्रिटिश काळात अनेकजबाबदाऱ्या सोपविल्या गेल्या होत्या. त्या काळात जिल्हयातील जनता प्रशासन क्षेत्रातील

क्षेत्रातील इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा करीत असत. त्यांचा त्यांचा तो सल्लागार व मार्गदर्शक असे त्यांच्या चाणाक्षपणाच्या व लोक विलक्षण कर्तृत्वाच्या आणि महसूल प्रशासनाच्या कथा दिर्घ काळ प्रचलित होत्या. पुढे 'कलेक्टर' हा महसूल प्रशासनाचा सर्वोच्च अधिकारी तथा महत्वपुर्ण घटक म्हणून पुढे आला. जिल्हयाचे विभाजन तहसील, मंडळ आदि स्तरावरून पुढे सज्जा स्तरांपर्यंत आले. या क्षेत्राचा तो पर्यवेक्षीय अधिकारी बनला.

एकविसाव्या शतकात जगभरातील अर्थ व्यवस्थामध्ये माहिती व तंत्रज्ञानाची संकल्पना पुढे आली व विकसित झाली. महसूल प्रशासनाच्या उन्नतिसाठी हे तंत्रज्ञान संप्रेरक ठरले असल्याने सक्षम, तत्पर प्रशासन आणि महसूल प्रशासनाच्या विकासासाठी माहिती तंत्रज्ञान महत्वाचे ठरत आहे. म्हणून जगातील बहुतांश देशांनी या क्षेत्रात गुंतवणूक करून या तंत्रज्ञानाची जोड विकास प्रक्रियेशी घातली आहे. भारतातच नव्हे तर जगभरात माहीती तंत्रज्ञानाचे महत्व पटले आहे. हा माहिती व तंत्रज्ञानाचा विकास जोपर्यंत सर्वसमावेशकहोत नाही तो पर्यंत त्याला अर्थ नाही. तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत शासनाच्या जनकल्याण योजनेचे व महसूल विभागाच्या सेवांचा लाभ पोहचले पाहिजेत. या साठी उत्तम व पारदर्शक प्रशासनाची गरज असते. प्रशासन किंवा सरकार थेट सामान्य माणसापर्यंत पोहचले पाहिजे, हे प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आधुनिक काळातमाहीती व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून 'ई-प्रशासना' ची संकल्पना उदयास आली. सरकारचे आणि महसूल विभागाचे लाभ सामान्य माणसापर्यंत पोहचविण्याचे महत्वपूर्ण कार्य ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून साध्यझाले आहे. महसूल विभागाच्या योजनांचे लाभार्थी किंवा अन्य नागरीकांना तत्पर सेवा देण्याच्या दृष्टिने 'ई-गव्हर्नन्स' ही आज काळाची गरज बनली आहे.

विज्ञान व तंत्रज्ञानाने आज सामान्य माणसाला ही तत्परता व पारदर्शकतेची हमी देण्यासाठी माहिती तंत्रज्ञाना सारख्या माध्यमाची देणगी दिली आहे. यातून माहिती व तंत्रज्ञानाच्या साधनांची महसूल विभागाच्या कामकाजात सुसूत्रता आली तसेच कार्यक्षमता ही वाढली आहे. ई-गव्हर्नन्सच्या तंत्रज्ञानामुळे महसूल कार्यालयाची जवाबदारी वाढली आहे.आज प्रत्येक कामकाजावर सामान्यातला सामान्य माणसाचे online लक्ष्य आहे. ज्यामुळे अधिकारीव कर्मचाऱ्यांच्या दप्तर दिरंगाईला लगाम बसला आहे. यामुळे आज ई-गव्हर्नन्सचे महसूल प्रशासनात महत्व वाढत चालले आहे. ई-गव्हर्नन्स चे उपक्रमामध्ये G2C (Government To citizen),G2B (Government To Business), G2G (GovernmentTo Governmet, G2E (Government To Employee), ई-प्राप्ती, Digital Identity and standardization, M-governance ईत्यादी उपक्रमाद्वारे सेवा वितरण प्रणालीमध्ये पारदर्शकता येऊन प्रशासन प्रक्रियेत तत्परता, वेळेची बचत होऊन प्रशासन प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढत आहे.

उपरोक्त स्थितीचा विचार करता प्रस्तुत संभाव्य संशोधन कार्यात महाराष्ट्र राज्याच्या महसूल प्रशासनामध्ये ई-गव्हर्नन्स चा उपयोग कसा होत आहे, त्याचे होणारे परिणाम अभ्यासनाच्या दृष्टीने सदरील संशोधन कार्य केले जाणार आहे. संशोधक विदयार्थी हा स्वत: प्रत्यक्ष प्रशासनात कार्यरत असल्याने विषयाचा जवळुन अभ्यास करण्यासाठी संशोधन कार्याचा निवडलेला विषय असा आहे, "ई-गव्हर्नन्स चा महाराष्ट्राच्या महसूल प्रशासनावर झालेला प्रभाव- विशेष संदर्भ: नागपूर विभाग"

संशोधन अभ्यास विषयाचे महत्व :

राष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी उदयोग-व्यवसाय, व्यापार-वाणिज्य, कृषी ईत्यादी क्षेत्रामध्ये विविधांगी प्रगती होणे आवश्यक असते. विकास हा सर्व समावेशक होणे गरजेचे असते. गरीबातल्या गरीब माणसापर्यंत विकासाचे लाभ पोहचले पाहिजेत. शिवाय ते टिकाऊ असले पाहीजेत. यासाठी उत्तम व पारदर्शक प्रशासनाची नितांत गरज असते. प्रशासन जितके कार्यक्षम, तत्पर, दक्ष व जवाबदार असेल तितका देशाचा वेगाने विकास होवू शकेल. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा प्रशासन किंवा शासन थेट सामान्यापर्यंत पोहचेल. या आदर्श विचाराच्या परिपूर्तिसाठी आधुनिक काळात ई-प्रशासनाची म्हणजे e-Governance ची संकल्पना विकसित झाली.

शासनाचे कार्य संचलनाचे तंत्र सामान्यापर्यंत पोहोचवण्याचे हे आव्हानात्मक कार्य ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून साध्य झाले आहे. सरकारी योजना, सेवा-सुविधा लाभार्थी किंवा नागरिकांना तत्परतेने देणाच्या दृष्टिने ई-प्रशासन ही काळाची गरज बनली आहे. शासनाच्या सर्व विभागाची माहिती लोकांपर्यंत सहजपणे पोहचवणे सहज शक्य झाले आहे. शासना तर्फे दिल्या जाणा-या सुविधा व सेवा लोकांना थेट घरापर्यत दिल्या जात आहेत. माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रयोगाने निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढत चालला आहे. म्हणजेच ई गव्हर्नन्स सरकार आणि जनता यातील एक महत्वाचा दुवा बनला आहे.

वैश्विक स्तरांवर माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राचा वापर वाढत आहे सक्षम, पारदर्शी व प्रशासन आणि उपलब्ध मनुष्यबळाच्या विकासासाठी ई-गव्हर्नन्स महत्वाचे ठरत आहे.ई-गव्हर्नन्स मुळे प्रशासन सर्व सामान्यापर्यंत पोहचत आहे. महसूल प्रशासनात गतीमानता, पारदर्शकता, तत्परता, स्वच्छ व स्वष्ट, क्रियाशीलता आदिंचा प्रवेश होणे हे केवळ ई-मुळे शक्य होत आहे.परिणामत: ई प्रशासनात ई गव्हर्नन्सला अत्याधिक महत्व प्राप्त होत आहे.

जिल्हा प्रशासन हा भारतीय प्रशासन व्यवस्थेचा गाभा आहे.प्रशासन म्हणजे जनकार्याचे व्यवस्थापन तर जिल्हा प्रशासन म्हणजे त्या विशिष्ट भूभागातील सेवा संदर्भातील लोक कार्यांचे

कार्यांचे व्यवस्थापन होय. लोक कल्याणकारी योजनाव्दारे जो विकास साधायचा आहे त्यासाठी उपयुक्त घटक म्हणून जिल्हा हाच एकमेव घटक पूरक ठरत आहे. जिल्हयाच्या ठिकाणाहूनच विकासाच्या सर्वकार्यात समन्वय साधता येतो. जास्तीत-जास्त लोकांजवळ पोहचण्याचे साधन म्हणजे महसूल प्रशासन होय. आज प्रशासन व्यक्तिच्या जन्मापूर्वी, जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सर्व कार्य सहजतेने करीत आहे. म्हणून आधुनिक राज्य कल्याणकारी राज्य म्हणून ओळखली जातात. नागरिक केंद्रीत धोरणाला आजच्या काळात अत्याधिक महत्व प्राप्त झाल्यामुळे प्रशासनाने आपल्या कार्यपध्दतीत अमूलाग्र बदल केला आहे. पारंपारिक प्रशासनाची जागा आज ई-गव्हर्नन्सने घेतली आहे. आजच्या इलेक्ट्रॉनिक व डिजीटल युगात महसूल प्रशासनाने नागरीकांना कोणत्याही वेळी कोणत्याही ठिकाणी सेवा वितरण करण्यासाठी सुवर्ण जयंती राजस्व अभियान (लोकाभिमुख महसूल प्रशासन) मोठया प्रमाणात राबवित आहे. समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत महसूल व सेवा-विषयक योजनांचा लाभ मिळाला पाहीजे, हा ई-गव्हर्नन्सचा मुख्य हेतु आहे. ई-गव्हर्नन्स प्रणालीचा वापर नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा व विकासाच्या योजनांची अंमलबजावणी कार्यक्षम, पारदर्शक, प्रभावी, कमी किंमतीत त्वरीत, उच्च दर्जाच्या करण्यासाठी होत आहे. यातूनप्रशासनाची जवाबदारी व उत्तरदायित्व वाढले त्यामुळे ई-गव्हर्नन्स शासन आणि जनता यामधील महत्वाचा दुवा ठरला आहे. महसूल प्रशासनाच्या विविध सेवा व योजनांची माहिती सहजपणे सर्वत्र उपलब्ध होत असल्याने जनता प्रशासनाशी प्रत्यक्ष जोडली गेली. त्यामुळे मध्यस्थ वा दलालांचा प्रभाव प्रशासनापासून कमी झाला आहे.या बदलत्या प्रशासकीय स्थिती संदर्भात ई-गव्हर्नन्सची भूमिका कश्या प्रकारची आहे. हे प्रस्तुत संशोधन कार्यात अभ्यासले जाणार आहे व महसूल प्रशासनाकरीता आवश्यक त्या सूचना व उपाय-योजना संशोधनाअंती मांडण्यात येतील.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधन कार्य योग्य दिशेने जाण्यासाठी खालील पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

(1) “E-Governanance in India Initiatives and Issues” हा संदर्भ ग्रंथ 2006 मध्ये आर. पी. सिंह यांनी प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथामध्ये भारत सरकार व निवडक राज्यांव्दारा ई-गव्हर्नन्सच्या अंमलबजावणीच्या केलेल्या प्रयत्नांचे व्यवस्थित विवरण प्रस्तूत केले आहे. तसेच भारतामध्ये ई-गव्हर्नन्सच्या अंमलबजावणीसाठी येणा-या अडचणी संदर्भाने सुध्दा मांडल्या आहेत.

(2) ADANCES IN E-GOVERNANCE • Theory andApplicatim of Technological Initiatives" हा संदर्भ ग्रंथ Anthony Trotta यांनी 2018 मध्येप्रकाशित केला. या मध्ये ई-गव्हर्नन्सचा

इतिहास, मॉडेल्स,मतदान प्रक्रिया, ई-शासन व ई-गव्हर्नन्स आदि संकल्पनाचे विस्तृत विवेचन केले आहे. जे ई-गव्हर्नेन्सच्या अंमलबजावणी साठी महत्वाचे आहे.

(3) "Unlocking E-Government Potential: concepts Cases and practical Insights" हा ग्रंथ सुभाष भटनागर यांनी 2009 मध्ये प्रकाशित केला. या मध्ये ई- शासन: संकल्पना, स्वरूप, व्याप्ती, विकसनशील देशांमध्ये ई-शासन प्रणाली, लाभार्थींना ई गर्व्हमेंटचे फायदे, पारदर्शिता व भ्रष्टाचारावर ई-गर्व्हमेंटचा पडलेला प्रभाव, तसेच ई-गर्व्हमेंटच्या अंमलबजावणी साठी सूचना आदि बद्दल सखोल संशोधन मांडले आहे.

(4) "भारत में ई-गव्हर्नन्स: एक वास्तविकता" हा देवा, वायुयांच्याव्दारे लिखित संदर्भ ग्रंथ सन सन 2005 मध्ये प्रकाशित झाला. यामध्ये ई-गव्हर्नन्स चे स्वरूप व व्याप्ति, योजना व कार्यान्वयन, संसाधन व तंत्रज्ञानाचा वापर या बद्दल सविस्तर विश्लेषण आहे. जे संशोधन कार्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.

संशोधनाची उदिष्टये :-

प्रस्तुत संशोधन कार्याची उदिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

1. भारतातील ई-गव्हर्नन्सच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेची चर्चा करणे.
2. ई-गव्हर्नन्सच्या अंमलबजावणीच्या बदलांचे परीक्षण करणे आणि ई-गव्हर्नन्सच्या अंमलबजाणी नंतरच्या घडामोडीचा अभ्यास करणे, नागपूर विभागाच्या संदर्भात.
3. महसूल प्रशासनात ई-गव्हर्नन्सच्या प्रभावी अंमलबजावणीच्या मार्गात येणा-या आव्हानावर प्रकाश टाकणे, नागपूर विभागच्या संदर्भात.
4. महसूल प्रशासन यंत्रणेचा अभ्यास करणे.
5. महसूल प्रशासनात ई-गव्हर्नन्स प्रक्रियेचा अभ्यास करणे.

संशोधकाचे गृहितके :

1. ई-गव्हर्नन्समुळे महसूल प्रशासनात अमुलाग्र बदल झालेले आहेत.
2. महसूल विभागाच्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये केंद्रीय स्तरांपासून निम्न स्तरांपर्यत ई-गव्हर्नन्सचा वापर प्रभावीपणे होतांना आढळतो.
3. ग्रामीण आणि दुर्गम भागातील प्रशासकीय कार्यालयामध्ये इंटरनेट सुविधेची उपलब्धता व्यवस्थित होत नसल्यामुळे ई-गव्हर्नन्सची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही.
4. महसूल प्रशासनामध्ये पारदर्शिता व गतिमानता आणण्यासाठी ई-गव्हर्नन्स प्रभावी ठरत ठरत आहे.
5. महसूल प्रशासनात ई-गव्हर्नन्स मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत.

6. महसूल प्रशासनामध्ये कार्यालयीन कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा वापर होतांना दिसून येतो.

संशोधन पध्दती :

प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीची निवड करण्यात आलेली आहे. वर्णनात्मक संशोधनाव्दारे संकलित तथ्यांचे विश्लेषण केले जाणार आहे.

माहिती संकलन :

प्रस्तुत संशोधन अभ्यास विषयाच्या अनुषगांने माहिती संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला जाणार आहे.

(अ) प्राथमिक स्त्रोत :

संशोधन कार्यात प्राथमिक स्त्रोतार्तंगत निरिक्षण, प्रश्नावली-मुलाखत पध्दतीचा वापर केला जाणार आहे. महसूल प्रशासनामध्ये महाराष्ट्राच्या विदर्भ क्षेत्रातील नागपुर विभागातील सर्व जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या ई-गव्हर्नन्स मोहिमेची प्रत्यक्ष माहिती माहिती घेतली जाणार आहे.

(ब) दुय्यम स्त्रोत :

प्रस्तुत विषयाच्या अनुषगांने प्रकाशित व अप्रकाशित लिखाण, केंद्र व राज्यशासन तसेच तसेच भारत सरकारचे अहवाल, संशोधक प्रबंध, ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, साप्ताहिके व इंटरनेट यांचा वापर केला जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :

सदरील अध्ययनक्षेत्राची व्याप्ती महाराष्ट्र राज्यातील विदर्भ प्रदेशातील नागपूर विभाग आहे.

अध्ययन क्षेत्र: :

महाराष्ट्राच्या विदर्भ प्रदेशाचा नागपूर विभाग हे संशोधन अभ्यासाचे क्षेत्र आहे. अध्ययनासाठी निवडलेल्या कार्यक्षेत्रात नागपूर महसूल विभागातील वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली हे जिल्हे संशोधनाचे क्षेत्र आहे. या सर्व जिल्हयांमध्ये महसूल प्रशासनात ई-गव्हर्नन्सचा वापर कमी-अधिक प्रमाणात होत आहे. या संशोधन कार्यासाठी संशोधकाने महसूल प्रशासनातील सज्जा, मंडळ, तहसील, प्रांत, जिल्हा व विभाग स्तरावर ई-गव्हर्नन्सचा पडलेला प्रभाव अभ्यासन्याचे योजले आहे.

नमुना निवड:

संशोधन क्षेत्राच्या अभ्यासा संदर्भात संभाव्यता नमुना निवडपद्धतीचा उपयोग केला आहे. या अंतर्गत 'साधा यदृच्छिक नमुना (Random Sampling) निवडपध्दतीचा आवश्यकते नुसार अवलंब केला जाईल.

अध्ययनाच्या मर्यादा :

प्रस्तावित संशोधन कार्याच्या मर्यादे संदर्भात असे म्हणता येईल की, संशोधन विषयाच्या विषयाच्या अध्ययनामध्ये महाराष्ट्राच्या महसूल प्रशासनाच्या संदर्भात ई-गव्हर्नन्सच्या प्रभावावरच अधिक लक्ष केंद्रीत असेल. तसेच या अध्ययनामध्ये नागपूर विभाग स्तरांवर ई-गव्हर्नन्स संदर्भात स्थितिनगतिकशी आहे, याचा विचार केला जाईल. त्याचप्रमाणे या संशोधन कार्यामध्ये नागपूर विभागातील सर्व-जिल्हयातील अधिकारी, कर्मचारी, सेवा-केंद्र इत्यादीचा महसूल व राजस्व अभियान सेवा संदर्भात विचार केल्या जाईल.

प्रकरण नियोजन :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी खालीलप्रमाणे प्रकरण योजना निश्चित करण्यात आलेली आहे.

प्रकरण 1 - प्रस्तावना

प्रकरण 2 - महाराष्ट्रातील नागपूर विभाग एक दृष्टीक्षेप

प्रकरण 3 - महाराष्ट्राचे महसूल प्रशासन: संरचना व कार्ये

प्रकरण 4 - महसूल प्रशासनात ई-गव्हर्नेन्सच्या अंमलबजावणीचा अभ्यास

प्रकरण 5 - ई-गव्हर्नेन्स कार्यक्रम: समस्या व आव्हाने

प्रकरण 6 - ई-गव्हर्नेन्स संदर्भात विविध घटकांचे योगदान

प्रकरण 7 - निष्कर्ष व शिफारशी.

संदर्भ सूची :

(अ)संदर्भ ग्रंथ सूची :

1. डॉ.नंदकुमार नाईक, महाराष्ट्र प्रशासन विद्याप्रकाशन, औरंगाबाद,2000
2. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम - 1966

3. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोष खंड-4, महाराष्ट्र राज्य आणि साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1976
4. मुखर्जी रविंद्रनाथ, सामाजिक शोध व सांख्यिकी, विवेक प्रकाशन, नई दिल्ली, 2006
5. Willam S. Goode and Paul hatt, Methods in Social Research, New York, 1952
6. डॉ.अर्जुनराव दर्शनकार, जिल्हा प्रशासन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद,1996
7. ॲड राम सेलकर, महसूल न्यायालये,कार्यपध्दती आणि मामलेदार न्यायालय अधिनियम-अधिनियम-1906.
8. डॉ.प्रभूदत्त शर्मा, भारतीय प्रशासन (सिध्दांत एवंम व्यवहार), रिसर्च पब्लिकेशन्स, जयपूर
9. ॲड राम सेलकर, महसूल न्यायालये,कार्यपध्दती आणि मामलेदार न्यायालय अधिनियम-अधिनियम-1906. अशोक ग्रोवर ॲड सन्स लॉ बुक्स सेलर्स ॲड पब्लिशर्स, औरंगाबाद. औरंगाबाद.
10. Magele, C.(2012). How to move from local e-government to collaborative e-governance; Guardian News and Media Limited. http:www.theguardian.com/local-governmentnetwork/2012/may/08/local-gevernment-e-citizenship
11. Schelin, S.H., (2003), E-Government: An overview. Public Information Technology: Policy and Manangment Issues. G.D. Garson. Hershey, PA, Idea Group Punlishing: 120-137.
12. Sier, S. (2005), E-Governance at the Local Government Level in the Philippines: An Assessment of City Government Websites; Philippine Journam of Develoapment SIAR 135 Number 60, Second Semester 2005, 32 (2)
13. रेड्डी उर्मिला डॉ, ई-प्रशासन,(2019), विद्या प्रकाशन, नागपूर.
14. Sinha, R.P., E-GOVERNANCE IN INDIA Initiatives and Issues, (2006), Delhi, Sankalpna Prakashan Comp.
15. Sharma, R. & Arora R.K., (2010), Good Governance stimuli and strategies, Jaipur, Aalekh Publishers.
16. Paemerval, P (2005), E-Governance: A Change Manangment Tool, New Delhi, Rawat Publication.
17. Yadav, Nikita and Singh V.B., (2012), E-Governance: Past, Present and Future in India, International Journal of Computer Application, Vol 53 (7).
18. Bygrave, A. & Bing, J (2009) Internet Governance Infrastucture and Institutions, New York: Oxford University, Press.

(ब) नियतकालिके, संशोधन पत्रिकाववेब साईट्स

1. दैनिक लोकसत्ता
2. दैनिक महाराष्ट्र टाईम्स
3. दैनिक पुढारी
4. लोकमत
5. सकाळ
6. सामना

7. एकमत
8. पुण्यनगरी
9. संचार
10. दिव्य मराठी
11. परिवर्तनाचा वाटसरु, व्दारा द युनिक अॅकॅडमी, पुणे.
12. समाजप्रबोधन पत्रिका, समाज प्रबोधन संस्था, पुणे
13. शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद
14. प्रबोधन प्रकाशन ज्योती, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी
15. साधना,साधना साप्ताहिक, सदाशिव पेठ, पुणे
16. योजना,योजना मासिक कार्यालय,नवी मुंबई
17. लोकराज्य,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई
18. अर्थबोध
19. अर्थसंवाद
20. इंडिया टुडे
21. समाजप्रबोधन पत्रिका
22. कुरूक्षेत्र
23. www.maha.gov.org.in
24. www.ruraldev.maharashtra.gov.in
25. www.mgnrega.nic.in
26. www.mahaegs.gov.in
27. http://www.digitalgovernance.org.

संशोधक

स्वाती वसंतराव सुर्यवंशी

मार्गदर्शक

डॉ.पंचशील एकंबेकर

प्राचार्य,

बी.पी.एकंबेकर महाविद्यालय,

हानेगाव ता.देगलूरजि.नांदेड